


इस्लामपूर : सामंजस्य करारावेळी पदाधिकारी.

# इंटरनॅशनल आऊटरिच सेंटरची स्थापना

**इस्लामपूर : प्रतिनिधी**

नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठात उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाविद्यालयामध्ये इंटरनॅशनल आऊटरिच सेंटरची स्थापना केल्याची माहिती व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेचे सचिव राहुल महाडिक यांनी दिली.

इंटरनॅशनल आऊटरिच सेंटरकरीता नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालय व पाथ सीडस ग्लोबल एज्युकेशन, कोल्हापूर यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला.

कार्यकारी संचालक प्रा. महेश जोशी म्हणाले, महाविद्यालय विद्यार्थीभिमुख उपक्रम राबवते. प्राचार्य डॉ. व्ही. ए. कुलकर्णी म्हणाले, जे विद्यार्थी परदेशात उच्च शिक्षण घेऊ इच्छितात त्यांना लाभ होणार आहे. प्रा. निलेश साने, प्रा. अमोल पाटील, सलील राजगुरू, सानिका डोईफोडे उपस्थित होते.